**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय कक्षाचे कुलगुरूंच्या हस्ते उद्‌घाटन
## मागासवर्गीय मुलांचे वसतीगृहाचा उपक्रम

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृहात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्याहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय कक्षाचे उद्‌घाटन संपन्न झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. जे. डी. वडते, वसतीगृहाचे वार्डन डॉ. रविंद्र सरोदे, उपकुलसचिव श्री प्रवीण राठोड, उपकुलसचिव डॉ. नितीन कोळी, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी ग्रंथालय कक्षामधील पुस्तकांचे अवलोकन केले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. अजय देशमुख बोलतांना म्हणाले विविध विषयांवरील पुस्तके ग्रंथालय कक्षाला प्राप्त झाली आहेत. अभ्यासासोबतच अभ्यासेतर ग्रंथाचे वाचन विद्यार्थ्यांनी करुन आपल्या ज्ञानात भर घालावी, आपले व्यक्तीमत्व सर्वांगीण करावे, असे सांगून विद्यार्थ्यांच्या कार्याला प्रोत्साहीत केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय कक्षासाठी वसतीगृहातील मुलांनी केलेल्या वर्गणीतून १७० पुस्तके, कुलगुरू व कुलसचिव यांनी ५० पुस्तके आणि विद्यापीठ मागासवर्गीय शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्यावतीने अध्यक्ष डॉ. नितीन कोळी यांनी विविध विषयांवरील १० पुस्तके भेट दिलीत.

सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेच पूजन, माल्यार्पण व मेणबत्ती प्रज्वलन अतिथींच्या हस्ते करण्यात आले. संचालन श्री महेश देवळे यांनी तर आभार श्री अभिजीत इंगळे यांनी मानले. याप्रसंगी वसतीगृहातील सर्व विद्यार्थी तसेच वसतीगृहाचे कर्मचारी श्री शेखर लोखंडे तसेच विद्यापीठ कर्मचारी उपस्थित होते.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १६/०४/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी